VOL- X ISSUE- IX SEPTEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# स्नेहालय या संस्थेचा सामाजिक व शैक्षणिक कार्य एक अभ्यास

**- प्राचार्या विनया रंगनाथ कांबळे**
(M.A.M.Ed.SET. D.C.M. G .D.C & A)
प्राचार्या खासदार गोविंदराव आदिक
डी.एड .कॉलेज श्रीरामपूर. जिल्हा.अहमदनगर.
**डॉ. कस्तुर चंद्रकांत राजमाणे**

**सारांश:**

*स्नेहालय ही संस्था अहमदनगर जिल्ह्यात वंचित घटकांसाठी काम करते. समाजाने नाकारलेल्या घटकांसाठी स्नेहालयाचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. समाजातील दिव्यांग, एडसग्रस्त, कुमारी माता, झोपडपट्टीतील मुलांच्या शिक्षणासाठी व समाजासाठी स्नेहालयाचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे वंचित घटकातील विद्यार्थ्यांना समाजप्रवाहात आणण्याचे कार्य स्नेहालय या संस्थेकडून होत आहे.*

*सूचक शब्द:*
*स्नेहालय, वंचितघटक, वंचित घटकांच्या मनस्थितीचा इत्यादी.*

**प्रस्तावना:-**

**स**माजात अनेक घटना घडत असतात पण त्याकडे सर्वांचे लक्ष नसते. स्वतः च्या प्रगतीपेक्षा समाजाचा विकास करू पाहणारे विलक्षण ध्येयवेडे लोक अगदी कमी असतात पण ते त्यांच्या ध्येयाने झपाटून जे काम करतात त्यामुळे ते स्वत:च एक वेगळ स्थान समाजात निर्माण करतात अशाच ध्येयवेड्या व्यक्तींमध्ये कुष्टरोग्यांसाठी अहोरात्र झटणारे डॉ. बाबा आमटे, अनाथ मुलांना पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळणाऱ्या सिंधुताई सपकाळ, स्त्रियांना शिक्षणाची वाट दाखवणारे फुले दाम्पत्य, तसेच समाजातील वंचित,उपेक्षित घटकांसाठी सतत कार्यरत राहणारे स्नेहालय संस्थेचे संस्थापक मा. डॉ. गिरीश कुलकर्णी सर इ. चा समावेश करता येईल.

डॉ. गिरीश सरांचे वंचितांसाठी केलेले कार्य इतरांना प्रेरणादायी व आदर्श ठरावे असे आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी स्नेहालय संस्थेचा केलेला अभ्यास संशोधन रूपाने सादर करत आहे.

कुष्टरोगी, अंध, अपंग, कर्णबधिर, एड्सग्रस्त अशा विविध वंचित आणि दुर्लक्षित घटकांना माणुसपणाच सामान्य जगण जगता यावं यासाठी यांनी आपलं उभं आयुष्य झिजवलं या घटकांना त्यांनी स्वत: च्या पायावर उभं राहण्याचं बळ दिलं दृष्टी दिली आणि संधी ही दिली या अचाट आणि अभूतपूर्व प्रयोगाचं जीवंत आणि चैतन्यमयी प्रतीक म्हणजे स्नेहालय.

स्नेहालयाची निर्मिती आणि त्याचा इथपर्यंतचा प्रवास 'माणूस' घडविणाऱ्यांचा आहे. नियतीने गिरीश सरांची वाट वेगळीच ठरवली होती. समाज आणि परिवाराने बहिष्कृत केलेल्या वंचित घटकांवर त्यांची दृष्टी पडली त्यांना जीवनाचे ध्येय सापडले जगण्याचा मार्ग मिळाला सुखकर आयुष्य सोडून ते वंचित घटकांसोबत आले व त्यांना घेऊन स्नेहालयाची मुहूर्तमेढ रोवली त्यावेळी त्यांच्या पाठीशी पत्नी प्राजक्ता ताई उभ्या होत्या; ताई सुद्धा सुखवस्तू घरातील कुटुंबातील परंतु त्यांनी समाजातील वंचितांसाठी झटणारा, त्यांची असावे टिपणारा जोडीदार म्हणून निवडला प्रत्येक कठीण प्रसंगात त्या गिरीश सरांच्या पाठीशी उभ्या राहिल्या ते ध्येयापासून दूर गेले नाहीत कालांतराने हजारो माणसे जोडली गेली

सर्व वंचित घटकांना समजून घेणारे स्नेहालय माहेर घर बनले.

समाजातील सर्व उपेक्षित घटकांना न्याय आणि अर्थपूर्ण संधी देणारी, शैक्षणिक व सामाजिक कार्य करणारी स्नेहालय संस्था उभारली.

वेळेनुसार स्वतः बदललं पाहिजे, तरच समाजाला बदलवू शकतो असा विलक्षण बदल घडवून आणणारा किमयागार म्हणजे डॉ. गिरीश कुलकर्णी, वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी त्यांच्या मुलांसाठी तसेच इतर वंचित, दुर्लक्षित घटकांसाठी अविरत काम करणारे अतिव प्रेमाने त्यांच्या विस्कटलेल्या आयुष्याला आकार देणारे डॉ. गिरीश कुलकर्णी. त्यांनी स्थापन केलेलं 'स्नेहालय' म्हणजे केवळ एक सेवादायी संस्था नाही तर तो एक समाजप्रवाह आहे. जो समाजापासून नाळ तुटलेल्या वंचितांना समाजाशी जोडतो. व साऱ्या समाजाला या वंचितांच्या वेदनेची जाणीव करून देतो.

आपल्या उद्दिष्टासाठी धोका पत्करून निर्भयपणे काम करण्याची क्षमता गिरीश सरांच्या आचरणामुळे 'स्नेहालय' च्या प्रत्येकच कार्यकर्त्यामध्ये निर्माण झालेली दिसते गिरिश सरांनी बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतूनच लोकांना दाखवून दिलं व आपल्या कार्याचं मोठ्या वटवृक्षात रूपांतर केलं पण या सर्व कार्यात त्यांच्या पाठीशी त्यांचे मित्र, सहकारी स्नेहालयाचे कार्यकर्ते, स्वयं सेवक खंबीरपणे उभे राहिले.

खूप चांगलं काम करत असूनही कित्येकदा समाजाच्या टिकेला तोंड द्यावं लागतं. पण धोका पत्करून न घाबरता, न डगमगता, ध्येयापासून विचलित न होता काम करणं ही जणू 'स्नेहालय' ची संस्कृती बनली आहे.

**संशोधनाची गरज :**

स्नेहालय ही संस्था समाजातील वंचित व उपेक्षित घटकांना एक सामान्य माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे व त्यांना तो मिळवा त्याच बरोबर त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे व त्यांचे पुनर्वसन करणे तसेच त्यांना सामाजिक आर्थिक, मानसिक, भावनिक, कौटुंबिक, शैक्षणिक आधार देण्याच्या उद्दिष्टाने कार्यरत आहे.

एड्स बाधित बालके व स्त्रिया, कुमारी माता अंध, अपंग बालके, तृतीय पंथी इ. चे पुनर्वसन करणे त्यांना सर्वांना चांगले आरोग्य व सुविधा देण्याचे कामही स्नेहालय ही संस्था करत आहे.

वंचिताच्या उदरनिर्वाहासाठी किमान कौशल्यावर आधारित व जीवनमुल्यावर आधारित शिक्षण देते कारण समाजातील उपेक्षित घटकाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा असल्यामुळे त्यांना सामान्य माणूस म्हणून जगण्यासाठी त्यांचे पुनर्वसन केले आहे.

कोणत्यातरी पुरुषापासून फसलेल्या भगिनींनी माझ्या घराला माहेर समजून बाळंतपनासाठी खुशाल यावे असे सांगणारे महात्मा फुले आता नाही परंतु अशा प्रकारे समाजाने नाकारलेल्या कुमारीमातांचे माहेर बनले स्नेहालय रचना आणि संघर्षाचा समतोल या दोन पायावर ही संस्था कार्य करत आहे. समाजातील समाजसेवी संघटना समाजसेवक व इतर संस्था सर्वांसाठी एक प्रेरणादायी म्हणून काम करते कारण स्नेहालय हे सरकारी काम नव्हे तर सामाजिक सहयोगावर उभे आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत, लिंग, राजकारण, स्वार्थकारण इ. चा भेदभाव न पाळता ही संस्था तळमळीने समाज प्रबोधनाचे कार्य करत आहे. तसेच दर्जेदार शिक्षण देणे व्यसनापासून मुक्ती, वंचित घटकांचे सक्षमीकरण करणे इ. वैशिष्ट्ये स्नेहालयाची आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

स्नेहालायातील घटकांसाठी काही करण्याआधी त्याचे समुपदेशन करावे लागते कारण त्यांचे मानसिक आरोग्य खालावलेले असते व मनात न्युनगंडाची भावना वाढलेली असते म्हणून त्यांच्यातील ही भावना काढून टाकण्याची गरज महत्त्वाची आहे त्यासाठी त्यांना मार्गदर्शन करावे व त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न करावा.

त्यांना या सध्याच्या परिस्थितीतून त्यांना बाहेर पडता येईल ही भावना त्यांच्यात रुजवणे व ती वाढवणे असे झाल्यास होणाऱ्या बदलाचा ते मोकळेपणाने स्वीकार करतील अन्यथा तो बदल स्वीकारणे त्यांना अवघड वाटेल.

1. पिडीत महिलांचे पुनर्वसन करणे व त्यांना समाजात सामान्यपणे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणे.
2. एड्स बाधित विद्यार्थ्यांना सर्वसामान्यपणे समाज प्रवाहात सामावून घेणे.
3. वंचित घटकांना शिक्षण देऊन त्यांच्यातील क्षमतांची जाणीव करून देणे.
4. वंचित घटकासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करून त्यांना स्वत: च्या पायावर उभे करून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे.
5. कुमारीमाता, शोषित महिलांचे पुनर्वसन करून त्यांच्या जीवनाला स्थिरता प्राप्त करून देणे.
6. शिक्षण आरोग्य व सक्षमीकरण या त्रिसूत्रीवर आधारित संपन्न आयुष्य व समाजात मानाचे स्थान मिळवून देणे.
7. समाजाचा वंचित घटकाकडे पाहण्याचा उपेक्षित दृष्टीकोन दूर करून सर्वसामान्य दृष्टीकोन वाढवणे.
8. वंचित घटकांबाबत कोणताही पूर्वग्रह दूषित दृष्टीकोन न ठेवता त्यांना भावनिक, मानसिक, आधार देणे व समाजाची मानसिकता सुधारणे.

समाजामध्ये त्यांना सर्वसामान्या सारखे जगता यावे व ते समाजापासून वंचित न राहता त्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या दृष्टीने स्नेहालय संस्था जे कार्य करते ते अतिशय महत्त्वाचे जनजागृतीचे व उद्बोधनाचे आहे. अशा या वंचित घटकांना स्नेहालयात आधार मिळतो म्हणून हे संशोधन हाती घेण्यात आले कारण समाजाची मानसिकता बदलणे महत्त्वाचे आहे.

**संशोधनाचे शीर्षक :**

“स्नेहालय या संस्थेचा सामाजिक व शैक्षणिक कार्य एक अभ्यास”

**समस्याविधान:-**

स्नेहालय या संस्थेचा सामाजिक व शैक्षणिक कार्य एक अभ्यास करणे.

**संशोधनाची कार्यात्मक व्याख्या :**

1. स्नेहालय :- समाजातील वंचित घटकांना सर्व प्रकारची पायाभूत सेवा देणारी संस्था म्हणजे स्नेहालय.
2. संस्था :- एखाद्या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करणार समूह म्हणजे संस्था.
3. सामाजिक कार्य :- समाजातील बहुतांश वंचित घटकांना समाजामध्ये स्थान मिळवून देण्यासाठी केलेला प्रयत्न.
4. शैक्षणिक कार्य :- वंचित घटकांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊन शिक्षण प्रवाहात सामील करून घेणे म्हणजे शैक्षणिक कार्य.

**संशोधन उद्दिष्ट्ये :**

1. स्नेहालय संस्थेच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीची माहिती करून घेणे.
2. स्नेहालय संस्थेतील पुनर्वसन लाभार्थीचा शोध घेणे व समस्यांची कारणे शोधणे.
3. स्नेहालयामधील समाविष्ट वंचित घटकांची शैक्षणिक सामाजिक, आर्थिक इ. समस्यांची माहिती प्राप्त करून घेणे.
4. स्नेहालय अंतर्गत लाभार्थींना देण्यात येणाऱ्या व्यावसायिक प्रशिक्षणाची माहीती घेणे.
5. स्नेहालय अंतर्गत समाविष्ट वंचित घटकांच्या मार्गदर्शन, समुपदेशनाचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

1. अनेक बालकांना पुनर्वसनाच्या समस्या जाणवतात.
2. निराधार बालकांना आधाराची गरज जाणवते.
3. दुर्बल, पिडीत, अत्याचारित महीलांना मार्गदर्शन व समुपदेशनाची गरज आहे.
4. वंचित घटक पुनर्वसनासाठी समाज प्रबोधनामध्ये समस्या जाणवतात.

**संशोधनाची व्याप्ती :**

1. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक कार्य करणाऱ्या इतर संस्थांना लागू आहे.
2. स्नेहालय सारखे कार्य करणाऱ्या स्वयंसेवीसंस्था व शासन समाज सेवक इ. ना लागू आहे.

3. प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील अहमदनगर, नाशिक, मुंबई, बेळगाव,पुणे या जिल्ह्यात विस्तारलेल्या व समाजात असणाऱ्या विविध वंचित घटकांसाठी लागू आहे.
4. हे महाराष्ट्रातील कुमारी माता, तृतीयपंथी, एडसग्रस्त, अत्याचारीत महिला,त्यांचे पुनर्वसन, बालविवाह, अनौरस बालके, दिव्यांग, निराधार इ.उपेक्षित घटकांसाठी लागू आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

1. अहमदनगर जिल्ह्यातून स्नेहालय या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेपुरतेच मर्यादित आहे.
2. स्नेहालय संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा विचार केला आहे आर्थिक बाबींचा फारसा विचार केलेला नाही.
3. निष्कर्ष माहितीच्या विविध प्रकल्पातील स्रोताकडून मिळालेल्या माहितीवर आधारित आहे.
4. संशोधनातील लाभार्थींच्या भाव भावना, मनस्थिती, आवड, सत्य असत्य यावर संशोधकाचे नियंत्रण असणार नाही.
5. संशोधनाचे निष्कर्ष सर्वत्र लागू होतीलच असे नाही.

**संशोधन पद्धती :**

अहमदनगर जिल्ह्यातील स्नेहालय संस्थेने वंचित घटकांसाठी केलेल्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक कार्याचा अभ्यास केलेल्या आहे. प्रस्तुत संशोधनात संस्थेच्या समग्र अभ्यासासाठी शैक्षणिक संशोधनामधील वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे, गुणात्मक संशोधन अंतर्गत व्यक्ति अभ्यास पद्धती या संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या व नमूना :**

स्नेहालय संस्थेमधील असणाऱ्या एकूण १३ प्रकल्पामध्ये असणाऱ्या सर्व लाभार्थींचा समावेश जनसंख्येत करणार आहे.

**नमुना निवड :**

स्नेहालय संस्थेमध्ये असणाऱ्या एकूण १३ प्रकल्पामधून प्रत्येकी २० लाभार्थींचे नमुना निवड (एकूण २६० लाभार्थी) असंभाव्यतेवर आधारीत सहज प्राप्त नमुना निवड पद्धतीने करणार आहे.

**माहिती संशोधनाची साधने व तंत्र :**

1. निरीक्षण लिखित नोंदी/दस्तऐवज
2. पदाधिकारी मुलाखत
3. स्वयंसेवक मुलाखत
4. लाभार्थी प्रश्नावली

प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. स्नेहालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या अभ्यासासाठी गुणात्मक संशोधना अंतर्गत व्यक्ति अभ्यास या पद्धतीचा वापर केला आहे.

**गुणात्मक माहिती संकलनाची साधने :**

प्रकाशित साहित्य :

- स्नेहालय स्थापनेपासून ते आजपर्यंत प्रकाशित पुस्तके
- स्नेहालय घटना
- स्नेहलयातील लिखित सर्व दस्तऐवज व मीटिंग अहवाल
- नियतकालिके, वार्षिक अहवाल, वृत्तपत्रे यातील स्नेहालय कार्याबद्दलचे प्रसिद्ध लेखन

**मुलाखती:**

- डॉ. गिरीश कुलकर्णी यांची मुलाखत
- लाभार्थी प्रश्नावली प्रत्येक विभागाचे २० लाभार्थी
- शाखाप्रमुख प्रश्नावली -१३
- स्वयंसेवक प्रश्नावली

**निरीक्षण :**

स्नेहालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील वातावरण, लाभार्थी यांचे निरीक्षण केले

**साधनांची विश्वसनीयता व सत्यता:**

प्रश्नावलीतील प्रश्न उद्दिष्टानुसार तयार करून पीएचडी मार्गदर्शक यांची मदत घेऊन त्यांच्या

सूचनांचा विचार करून प्रश्नावलींना अंतिम स्वरूप देण्यात आले आहे

**संख्याशास्त्रीय तंत्र :**

संशोधनात शेकडेवारी, आलेख व कोष्टक या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला आहे.

**माहिती संकलन प्रक्रिया :**

स्नेहालय संस्थेअंतर्गत निवडलेल्या प्रकल्पांना भेट देऊन लाभार्थी व शाखा प्रमुखाकडून सदर संशोधनाची माहिती प्रश्नावलीद्वारे संकलित करण्यात आली.

**मुल्यांकन पद्धत्ती तथा विश्लेषण :**

शेकडेवारी काढून अर्थनिर्वचन करून उद्दिष्ठानुसार प्राप्त माहितीचे विशेलाषण करण्यात आले.

**निष्कर्ष:**

**उद्दिष्ट क्रमांक.१**

1. समाजातील सर्व वंचित घटकांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे व तो त्यांना मिळायलाच हवा या जाणीवेतून स्नेहालय संस्थेची उभारणी झाली
2. संस्थेचे संस्थापक माननीय श्री डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी1989 मध्ये स्नेहालय संस्थेची स्थापना केली
3. देहविक्री करणाऱ्या स्त्रिया त्यांची मुले या सर्वांचे जीवन व होणारे हाल पाहून गिरीश सर अस्वस्थ झाले आणि या प्रश्नावर काम करण्याच्या ठाम निश्चयाने स्नेहालय संस्थेची पायाभरणी झाली
4. सामाजिक दृष्ट्या बळी पडलेल्या वंचित घटकांना सक्षम बनविण्यासाठी स्नेहालय संस्था कार्यरत आहे
5. स्नेहालयाचे विविध वंचित घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प कार्यरत आहे

**उद्दिष्ट क्रमांक.२**

1. अडचणीत सापडलेले अत्याचारित असुरक्षित एचआयव्ही बाधित अशा सर्व वंचित घटकांसाठी हक्काचे माहेरघर म्हणून ते स्नेहालयात दाखल झाले
2. स्नेहालयात दाखल झालेल्या वंचित घटकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले
3. वंचित घटकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना विविध सुविधा पुरविल्या जातात

**उद्दिष्ट क्रमांक.३**

1. वंचित घटकांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन शाळेची स्थापना करण्यात आली व गरजूंना शिक्षण दिले जाते
2. वंचित घटकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन त्यांना स्नेहालय संस्था मानसिक आधार देते
3. वंचित घटकांच्या आर्थिक समस्या जाणून घेऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यास स्नेहालय संस्था मदत करते
4. संस्था शिक्षणाद्वारे सर्वांगीण विकासासाठी अनेक सुविधा पुरवते त्यामुळे संस्थेची संख्यात्मक गुणात्मक प्रगती आढळते
5. लालबत्ती भागातील महिला त्यांचे आरोग्य समस्या आर्थिक समस्या मानसिक सबलीकरण स्नेहालय संस्था करते
6. स्नेहालयातील पुनर्वसन संकुलामुळे निराधारांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास झालेला आहे

**उद्दिष्ट क्रमांक ४**

1. स्नेहालय संस्थेमध्ये विविध उपक्रम राबविले जातात संस्था उपक्रमशील आहे
2. उदारनिर्वाहाची गरज भागवण्यासाठी विविध कौशल्य आधारित व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते
3. व्यवसायिक प्रशिक्षणांतर्गत विविध कार्यशाळा, शिबिरे, परिसंवाद, इत्यादीचे आयोजन स्नेहालयात केले जाते
4. व्यवसाय प्रशिक्षणामुळे वंचित घटकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी स्नेहालय संस्था कार्यरत आहे

**उद्दिष्ट क्रमांक ५**

1. वंचित घटकांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी स्नेहालय संस्थेकडून मार्गदर्शन केले जाते
2. वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी स्नेहालय संस्थेमार्फत समुपदेशन केले जाते
3. वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन केले जाते
4. समुपदेशनामुळे वंचित घटकांमधील न्यूनगंड दूर होण्यास मदत होते .

**शिफारशी/ उपाय :**

1. वंचित घटकाकडे पाहण्याचा समाजाचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यासाठी समाजाचे उद्बोधन करावे
2. एचआयव्ही बाधित एडग्रस्तांसाठी आरोग्य विषयक जनजागृती व व्याख्यानाचे आयोजन करावे
3. देहव्यापरातील महिलांना या व्यवसायापासून परावृत्त करण्यासाठी समाज जागृती करावी
4. वंचित घटकांना सर्व बाबतीत सहकार्य करून त्यांच्यात आत्मविश्वास वाढवण्यास प्रोत्साहन द्यावे

**पुढील संशोधनासाठी विषय-**

1. आनंदवन संस्थेचे सामाजिक कार्य एक अभ्यास
2. सिंधुताई सपकाळ यांचे शैक्षणिक कार्य व सामाजिक कार्य एक अभ्यास
3. आदर्श गाव हिवरे बाजार चे शैक्षणिक कार्य व सामाजिक कार्य एक अभ्यास

**संशोधनाची महत्त्वपूर्णता :**

समाजातील वंचित घटकांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इ.

विकासासाठी कार्य करणे त्यामुळे या संस्थेअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पामधील असणाऱ्या लाभार्थींना सर्वसामान्य माणूस म्हणून जगण्याचा अर्थ प्राप्त करून देत आहेत त्यामुळे या संशोधनाचा फायदा शासनाला, स्वयंसेवी संस्थेला तसेच समाजसेवकांना व वंचित घटकांसाठी कार्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला होईल.

**समारोप:**

वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित घटकासाठी कार्य करणाऱ्या स्नेहालय, संस्थेची निवड संशोधनासाठी करण्यात आली विषयनिश्चिती करून स्नेहालय, संस्थेच्या सामाजिक व शैक्षनिक कार्याची माहिती घेण्यासाठी पूर्वतयारी केली. संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये, गरज व महत्त्व, व्याप्ती, मर्यादा, गृहितके, कार्यात्मक व्याख्या संशोधन पद्धती, नमुनानिवड माहिती संकलनाची साधने व तंत्रे, इ. विषयी अभ्यास करण्यात आला. संस्थेच्या संस्थाप्रमुखांशी चर्चा करून मुलाखतीद्वारा संस्थेची स्थापना, कार्य व वाटचाल याविषयी जाणून घेतले. संस्थेच्या विविध विभागात कशा प्रकारे कार्य चालते हे समजावून घेण्यासाठी शाखाप्रमुखांशी संवाद साधला ज्या कार्यासाठी संस्थेचा उदय झाला त्या लाभार्थीमध्ये आत्मविश्वास वाढवून पुन्हा नव्या जोमाने जगायला शिकवणाऱ्या डॉ. गिरीश सरांच्या प्रयत्नाचे फळ स्नेहालयाच्या रूपाने बहरलेले दिसते.

स्वतःचे जीवन जगत असताना आपल्याच समोर आपल्या माता व बहिणींचे खडतर आयुष्य पाहून व्यथित होणारे व ते बदलण्यासाठी स्वतः प्रयत्न करणारे असामान्य व्यक्तिमत्व म्हणजे स्नेहालय संस्थेचे संस्थाप्रमुख डॉ. गिरीश कुलकर्णी सर होय. सामाजिक जाणिवेचे भान ठेवून स्वतःचे कर्तव्य मानून दुर्लक्षित, वंचित घटकांसाठी डॉ. गिरीश सरांनी अथक परिश्रम घेतले.

स्नेहालय संस्थेमुळे समाजातील एड्सग्रस्त अत्याचारी महिला, वंचित घटक या सर्वांना समाजात आत्मविश्वासाने जगण्याची दृष्टी देणारी संस्था म्हणजे स्नेहालय वेगळा दृष्टिकोन व विचार या कार्यातून दिसतो, असे हे सेवाकार्य सर्वांच्या सहकार्याने अद्ययावत सुरू आहे. यातूनच प्रभावित होऊन हे कार्य समाजातील तळागाळातील घटकापर्यंत पोहचवणे व त्यातून इतरांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने या सामाजिक संस्थेचा संशोधन अभ्यास करण्यासाठी संशोधिकेला प्रेरणा मिळाली व अशा सामाजिक संस्थामधून अनेक निराधारांना जगण्याचा आधार व दिशा मिळवण्यासाठी हा एक संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला. इतरांनाही या कार्यातून समाजासाठी

काहीतरी करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून स्नेहालय संस्थेचे कार्य सर्वांसमोर मांडत आहे.

संस्थेचा अभ्यास करताना प्रश्नावली मुलाखत या साधनाआधारे माहिती संकलन करून त्याआधारे निष्कर्ष काढण्यात आले. अशा प्रकारे संस्थेचे कार्य सर्वांना प्रेरणादायी ठरावे.

**संदर्भ पुस्तके :**


1. संवेदना स्नेहालयाची – स्नेहालय संस्था प्रकाशन
2. सेवाव्रती अनामप्रेम – प्रकाशक अनिता माने – तृ.आ. ९ ऑक्टोबर २०१५
3. सहकारातील कोहिनूर – स्नेहालय संस्था द्वारा प्रकाशित पुस्तिका
4. स्वाती गाडगीळ – 'कृती संशोधन व नवोपक्रम' सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे २००६
5. डॉ. हेमलता पारसनीस – 'शैक्षणिक संशोधन' नित्य नूतन प्रकाशन, पुणे नोव्हेंबर २००६
6. डॉ. वि.रा.भिंताडे – 'शैक्षणिक संशोधन पद्धती' नित्य नूतन प्रकाशन, पुणे सप्टेंबर २००६

७ सौ. शुभांगी कोपरकर, 'परिवर्तनाची पहाट' उन्मेष प्रकाशन, अहमदनगर.

7. कदम चा.प,चौधरी बा.आ(१९९२), शैक्षणिक मूल्यमापन पुणे, नूतन प्रकाशन
8. मुळे, रा.श. व उमाठे, वी,तु.(१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, औरंगाबाद विद्या बुक्स

**Web site**

१. www.snehalay.org
२. www.snehankur.org
३. www.snehadhar.org